आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१९ एप्रिल २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातली पाणी टंचाई दूर करण्यासाठी आराखडा तयार करण्याचं काम सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन
- हिंदीसह जास्तीतजास्त भाषा शिकण्याचे राज्यपालांचे आवाहन
- महाराष्ट्राच्या आणि मराठीच्या हितासाठी एकत्र येणाच्या राज ठाकरे यांच्या आवाहनाला उद्धव ठाकरे यांचा सकारात्मक प्रतिसाद

**आणि**

- गडचिरोली जिल्ह्यात ४ नक्षलवाद्यांना अटक

**<><><><><>**

राज्यातल्या अनेक भागातली पाणी टंचाई दूर करण्यासाठी आराखडा तयार करायचं काम सुरू आहे. टंचाईग्रस्त जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना यावर उपाययोजना करण्याचे आदेश दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. छत्रपती संभाजीनगरमध्ये ते वार्ताहरांशी बोलत होते.

समुद्रात वाहून जाणारं त्रेपन्न टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणण्याच्या योजनेला मान्यता दिली असून या वर्षाअखेर किंवा पुढच्या वर्षाच्या सुरुवातीला हे काम सुरू होईल, अशी ग्वाही त्यांनी बीड़मध्ये एका कार्यक्रमात दिली. कृष्णा कोयनेच्या पुराचं पाणी मराठवाड्यात आणण्याच्या योजनेलाही मंजुरी दिली असून पुढल्या महिन्यात याची निविदा काढली जाईल, असं फडणवीस यांनी सांगितलं. अहिल्यानगर आणि सा◌ेलापूर दा◌ेन्ही बाजूने उजनी धरणातून तीस  टीएमसी पाणी वळण बंधाऱ्याच्या माध्यमातून मराठवाड्यात येणार असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

बनावट पनीर किंवा चीज ॲनालॉग असलेल्या पदार्थाची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा इशारा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिला आहे. चीज ॲनालॉगचा वापर केल्यास तसा स्पष्ट उल्लेख ग्राहकाला दिसेल अशा पद्धतीने करणं अन्न सुरक्षा अधिनियमानुसार अनिवार्य आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील किमान १० चीज ॲनालॉग वितरकांची तसंच हॉटेल चालक, केटरर्स किंवा खाद्यपदार्थ विक्रेत्याची खरेदी-विक्री बिलं तपासावीत आणि त्यांनी शुद्ध पनीरच्या ऐवजी बनावट पनीर अथवा ॲनालॉगचा वापर करून ग्राहकांची फसवणूक केल्याचं निदर्शनाला आल्यास त्यांच्यावर कारवाई करावी ,असे आदेश झिरवाळ यांनी दिले आहेत.

**<><><><><>**

सर्वांना हिंदी भाषा बोलता यायला हवी, त्यामुळे हिंदीसह जास्तीतजास्त भाषा शिकाव्यात असं आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केलं आहे. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते आज बोलत होते. हिंदी बोलता आली तर आपण गोरगरीब जनतेच्या भावना अधिक चांगल्या पद्धतीने समजू शकतो, असं राज्यपाल म्हणाले. आपल्याला हिंदी बोलता येत नसल्याची खंतही राज्यपालांनी बोलून दाखवली.
विविध देशांत रोजगाराच्या संधी मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी तिथली स्थानिक भाषा शिकायला हवी, असा सल्लाही राज्यपालांनी दिला. लहान वयात भाषा शिकल्यास ती मोठेपणी संपदा ठरेल असे ते म्हणाले.

**<><><><><>**

मराठीसाठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी सगळी किरकोळ भांडणं सोडून सर्व मराठी माणसांनी एकत्र यावं आवाहन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलं आहे. मुंबईत ते कामगार सेनेच्या मेळाव्याला संबोधित करत होते. एकत्र येताना इतर

कुणालाही कळत नकळत मदत करायची नाही, याची शपथ घ्या अशी अट त्यांनी ठेवली आहे.

**होल्ड - उद्धव ठाकरे....**

महाराष्ट्र मोठा आहे आणि त्याच्या अस्तित्वाच्या समोर उद्धव ठाकरे यांच्यासोबतची भांडणं फार किरकोळ असल्याचं मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत म्हटलं आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांनी नाव न घेता ही प्रतिक्रिया दिली आहे.

**<><><><><>**

एनटीए, अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं आज सकाळी ‘जेईई मेन-२०२५’ प्रवेश परीक्षेच्या  सत्र-२ चे निकाल जाहीर केले. यंदा, एकूण २४ विद्यार्थ्यांनी जेईई मेन पेपर एक  मध्ये १०० पर्सेन्टाइल मिळवले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातल्या सानिध्य सराफ, आयुष  चौधरी आणि विशद जैन या तीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. परीक्षेचा निकाल कट-ऑफ यादीसह आता जेईई मेनच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या जेईई मेन पेपर एक च्या दुसऱ्या सत्रा साठी एकूण ९ लाख ९२ हजार ३५० उमेदवारांनी परीक्षा दिली होती.

**<><><><><>**

पुण्यातल्या दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात गर्भवती महिलेच्या मृत्यूप्रकरणी डॉ सुश्रुत घैसास  यांच्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ घैसास यांनी महिलेला योग्य वेळी उपचार न दिल्याचं निरीक्षण शासनाच्या  आणि रुग्णालयाच्या समितीने नोंदवलं होतं. त्यानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असं राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी समाजमाध्यमाद्वारे सांगितलं.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुक्यातल्या दिरंगी-फुलणार जंगलात झालेल्या चकमकीत सहभागी असलेल्या चार नक्षलवाद्यांना आज अटक करण्यात आली. यात रघु आणि जैनी हे दाम्पत्य तसंच झाशी लवांडे आणि मनिला गावडे यांचा समावेश आहे. चारही नक्षलवाद्यांवर ४० लाख रुपयांचं बक्षीस होतं अशी माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

महात्मा फुले राष्ट्रीय स्मारकासाठी आवश्यक असलेल्या जागा ताब्यात घेताना संबंधित जागामालक तसंच तिथल्या भाडेकरूंना नुकसानभरपाई कशी द्यायची, यासाठी इथल्या जागाबाधितांचं सर्वेक्षण पुन्हा करण्याचा निर्णय पुणे महापालिकेनं घेतला आहे. या भागातील जागामालक, भाडेकरूंच्या घरी जाऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून त्यांना कोणत्या प्रकारचा मोबदला अपेक्षित आहे, याची माहिती गोळा करून अहवाल तयार केला जाणार आहे अशी माहिती महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी दिली. जागा ताब्यात घेताना भूसंपादनाची सक्ती न करता, जागामालकांना आवश्यक तो मोबदला देऊन या जागा ताब्यात कशा मिळतील, यासाठी महापालिका प्रशासनाचा प्रयत्न राहणार असल्याचं आयुक्तांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

‘परधान’ या आदिवासी जमातीची संस्कृती आणि परंपरेची जोपासना करण्यासाठी आणि या समाजाला स्वतंत्र ओळख मिळवून देण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत असं प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी आज केलं. यवतमाळमध्ये ‘परधान साहित्य आणि सांस्कृतिक कला महोत्सवाचं उद्घाटन झाल्यावर ते बोलत होते.

**<><><><><>**

जनसंघाचे संस्थापक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी ‘एकात्म मानवदर्शन’ आणि ‘अंत्योदय’ या विचारांची मांडणी सर्वप्रथम एप्रिल १९६५ मधे केली. या घटनेला ६० वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त एक विशेष कार्यक्रम मुंबईच्या रुईया महाविद्यालयात होणार आहे. कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आज मुंबईत पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची सभा देखील रुईया महाविद्यालयात झाली होती. त्याचं औचित्य साधून येत्या २२ ते २५ एप्रिल दरम्यान ‘पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हिरक महोत्सव’ तिथं आयोजित करण्यात आला आहे. अंत्योदय, भू सांस्कृतिक राष्ट्रवाद, लोकमत परिष्कार, भारताची विकासाची व्याख्या, पंडित दीनदयाळ यांचं आर्थिक चिंतन अशा विविध विषयांवर या कार्यक्रमात विचार मंषन होईल असं लोढा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कोणत्याही कामासाठी पोलीस ठाण्यात आलेल्या नागरिकांचा अनुभव जाणून घेण्यासाठी गोंदिया जिल्ह्यात पोलीस खात्याने नागरिक प्रतिसाद प्रणाली कार्यान्वित केली आहे. जिल्ह्यातल्या सर्व पोलीस ठाण्यांमध्ये लावलेला क्यूआर कोड मोबाईलने स्कॅन करून नागरिक आता थेट पोलीस अधीक्षकांना आपला अभिप्राय देऊ शकणार आहेत. नागरिकांचा प्रतिसाद जाणून घेत त्यावरून सुधारणा करून अधिक जलद गतीने सेवा देण्याचा प्रयत्न केला जाईल असं गोंदियाचे पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुंबई छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दोन्ही धावपट्ट्यांच्या पावसाळा पूर्व देखभालीच्या कामासाठी येत्या ८ मे रोजी इथली विमान वाहतूक सकाळी ११ ते संध्याकाळी ५ या वेळात बंद राहणार आहे.

**<><><><><>**

आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्सनं गुजरात टायटन्स समोर २०४ धावांचं आव्हान ठेवलं आहे. अमदाबादमध्ये हा सामना सुरू आहे. प्रथम फलंदाजी करताना दिल्लीचा संघ ८ गड्यांच्या बदल्यात २०३ धावांवर बाद झाला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा गुजरातच्या १५ व्या षटकात २ बाद १४२ धावा झाल्या होत्या.
दुसरा सामना रात्री साडे ७ वाजता जयपूरमध्ये सुरू होईल. राजस्थान रॉयल्स विरुद्धच्या या सामन्यात लखनौ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकण आणि मराठवाड्यात हवामान कोरडं राहील. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहील. या काळात विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**